**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२४९**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : ०४ ऑगस्ट, २०१६

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २५ जुलै, २०१६ रोजी झालेल्या २४९व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

मुख्य सचिव,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - अध्यक्ष

श्री. द. म. सुकथनकर
"प्रिया", वरळी सी फेस,
वरळी, मुंबई - ४०० ०१८. - सदस्य

श्री. एन्. व्ही. मेराणी
ए/४७, आदर्श नगर,
वरळी, मुंबई - ४०० ०२५. - सदस्य

डॉ. शिरीष संख्ये
संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,
एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. - सदस्य

प्रधान सचिव (१),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

प्रधान सचिव,
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२. - सदस्य

..२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं. म. प्र. वि. प्राधिकरण

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

-----------xox----------

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीची २४९वी बैठक**

**दिनांक :** **२५ जुलै, २०१६ (सोमवार)**

**वेळ :** **दुपारी १२.०० वाजता**

**स्थळ :** **मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,**
**६ वा मजला, मंत्रालय,**
**मुंबई – ४०० ०३२**

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. स्वाधीन क्षत्रिय<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. द. म. सुकथनकर | - | सदस्य |
| श्री. नितीन करीर<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग | - | सदस्य |
| श्री. श्रीकांत सिंह<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग | - | सदस्य |
| श्री.अजोय मेहता<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त,<br>मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री. डी. के. जैन
अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग

श्री. सतिश गवई
प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग

श्री. प्रवीण दराडे
अति.महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. पी. आर. के. मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संपतकुमार
प्रमुख,
नगर व क्षेत्र नियोजन विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्त सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय यादव
उप-महानगर आयुक्त (प्रकल्प समन्वयक),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. दि. न. कवठकर
सह-प्रकल्प संचालक (जनसंपर्क) आणि
उप-महानगर आयुक्त (प्रशासन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. शं. सि. देशपांडे
सह-प्रकल्प संचालक (नगर नियोजन),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. रा. म. गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. संजय नानावटे
सचिव,
कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती व सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, श्री. डी. के. जैन, अपर मुख्य सचिव, वित्त विभाग व श्री. सतिश गवई, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांचे कार्यकारी समितीचे नवे पदसिध्द 'निमंत्रित' म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

तसेच श्रीमती मालिनी शंकर, माजी अपर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग यांनी कार्यकारी समितीचे पदसिध्द 'निमंत्रित' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या २४८व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या २४८व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यकारी समितीच्या दिनांक १८ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या २४८व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालसंबंधी चर्चा करताना खालील विषयांवर चर्चा करण्यात आली :-

**बाब क्र.४ : प्राधिकरणाव्दारे स्मार्ट बीकेसी प्रकल्प राबविण्याच्या निविदेस मान्यता मिळण्याबाबत.**

या विषयाबाबत महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाद्वारे स्मार्ट बीकेसी प्रकल्प राबविण्याच्या निविदेबाबत कार्यकारी समितीने सुचविल्याप्रमाणे प्राधिकरणाने केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली. M/s.Reliance Infrastructure या निविदाकाराने निविदेची मुदत वाढविण्यास नकार दिल्याने ही निविदा CVC Guidelines प्रमाणे

L-1 Backed out समजून पुन:श्च Re-tender करावे किंवा कसे याबाबत चर्चा झाली व ही निविदा प्रक्रिया बंद करुन पुन:श्च नव्याने निविदा प्रक्रिया चालू करावी असे ठरले.

त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.३ : मेट्रो मार्ग-७ अंधेरी (पूर्व) — दहिसर (पूर्व) या मेट्रो मार्गाच्या स्थापत्य, वास्तू आणि इमारत सेवा विद्युत व यांत्रिकी कामासाठी सविस्तर संकल्पचित्र सल्लागार (DDC) ची नियुक्ती करणे.**

३.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक व परिवहन व्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याच्या उद्देशाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने १७२ कि.मी. मेट्रो रेल्वे प्रकल्पाचा बृहत आराखडा (Master Plan) बाबत तसेच बृहत आराखडयातील ११८ कि.मी. उन्नत मेट्रो मार्गांची त्वरीत अंमलबजावणी करण्याकरीता प्राधिकरणाच्या दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी झालेल्या १३८ व्या बैठकीत रु.३५,४०० कोटी किंमतीच्या ११८ कि.मी. लांबीच्या मेट्रो आराखडयास मान्यता दिलेली आहे. तसेच DMRC यांनी मेट्रो मार्ग ७ साठी अंदाजित केलेल्या रु. ४१८३ कोटी (सन २०१५ भावपातळी नुसार, करासहीत) मुळ किंमतीच्या खर्चास सदर बैठकीत प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच राज्य शासनाने मेट्रो बृहत आराखडयातील ११८ कि.मी. मेट्रो मार्गास व मेट्रो -७ अंधेरी (पूर्व) - दहिसर (पूर्व) प्रकल्पाची अंमलबजावणी मुं.म.प्र.वि.प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली असून प्रकल्प पूर्णत्वाच्या एकूण रु. ६,२०८ कोटी किंमतीस राज्य शासनाने मान्यता दिली. तसेच केंद्र शासनाच्या शहर विकास मंत्रालय व अर्थशास्त्र प्रकरण विभाग यांनी एशियन डेव्हलपमेंट बँकेकडून मेट्रो मार्ग -७ करीता रु.२,२४६ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य घेण्यास तत्वत: मान्यता दिलेली आहे.

३.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, कार्यकारी समितीने दिनांक १८ एप्रिल, २०१६ रोजीच्या २४८व्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार कंत्राटदारांस दिनांक ९ मे, २०१६ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले असून दिनांक १ जून, २०१६ रोजी कामास प्रारंभ झाला आहे.

३.३ महानगर आयुक्त यांनी Detailed Design Consultant (DDC) सल्लागारांच्या नेमणूकीबाबत माहिती देताना असे सांगितले की, DMRC यांनी दिल्ली व अन्य शहरांतील मेट्रो प्रकल्पांच्या धर्तीवर DDC सल्लागार नेमणूकीसाठी अंदाजपत्रके व मसुदा निविदा सादर केल्या असून सल्लागारांकडून प्रामुख्याने खालील सेवा अपेक्षित आहेत :-

१. कंत्राटदाराने सादर केलेल्या संकल्पचित्रांची पुर्नतपासणी (Proof Checking) करणे.

२. स्थानकांच्या इमारतीचे वास्तुकला योजना (Architectural Scheme) तसेच विद्युत व यांत्रिकी सेवांचे संकल्पचित्र बनविणे.

३. डेपोतील इमारतींचे विस्तृत संकल्पचित्र बनविणे.

३.४ महानगर आयुक्त यांनी DDC निविदा प्रक्रियेची माहिती देताना असे सांगितले की, मेट्रो मार्ग - ७ च्या अंधेरी (पूर्व) - दहिसर (पूर्व) या मेट्रो मार्गाच्या स्थापत्य, वास्तु आणि इमारत सेवा, विद्युत व यांत्रिकी कामासाठी DDC ची नियुक्ती करणेकरिता ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. दिनांक ७ एप्रिल, २०१६ रोजी प्राप्त निविदांचे लिफाफा 'अ' उघडण्यात आले. केवळ एकाच निविदाकाराने निविदा सादर केल्याचे दिसून आले. एकाच निविदाकाराने निविदा सादर केल्याने नियत प्रक्रियेस अनुसरुन सदरहु कामाकरीता द्वितीय ई-निविदा दिनांक १८ एप्रिल, २०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याचा शेवटचा दिनांक ५ मे, २०१६ होता. दिनांक १० मे, २०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता लिफाफा 'अ' (निविदा व इसारा किंमत) व 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १ | M/s. AECOM Asia Company Ltd, Gurgaon |
| २ | M/s. Systra MVA consulting (India) Pvt. Ltd., New Delhi |
| ३ | Consortium M/s. 3 TI Progetti Italia SPA & M/s. TCE, Italy & New Delhi |
| ४ | Consortium M/s. Feedback Infra Pvt Ltd & M/s. Fountainhead, New Delhi |
| ५ | M/s. AYESA Ingenieria Arquitectura, SAV, Gurgaon |

३.५ प्राप्त झालेल्या ई-निविदांची पात्रता व तांत्रिक छाननी DMRC मार्फत करण्यात आली, DMRC यांनी त्यांचा अहवाल प्राधिकरणास दिनांक १८ जून, २०१६ रोजी सादर केला. अहवालानुसार निविदाकारांचा पात्र/अपात्रतेचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव | पात्र/ अपात्र |
|---|---|---|
| १ | M/s AECOM Asia Company Ltd | पात्र |
| २ | M/s Systra MVA consulting (India) Pvt. Ltd. | पात्र |
| ३ | Consortium M/s ३ TI Progetti Italia SPA & M/s. TCE | पात्र |
| ४ | Consortium M/s. Feedback Infra Pvt. Ltd. & M/s. Fountainhead | **अपात्र** |
| ५ | M/s AYESA Ingenieria Arquitectur SAV | पात्र |
| | **एकूण** | **०४/०५** |

३.६ DMRC यांनी सादर केलेल्या अहवालानुसार Consortium M/s. Feedback Infra Pvt. Ltd. & M/s. Fountainhead या निविदाकाराची अर्थिक तरलता (-) २५.१३ कोटी असल्याने त्यांचे तांत्रिक प्रस्ताव अपात्र ठरविले.

३.७ महानगर आयुक्त यांनी निविदा शिफारस समितीची माहिती देताना सांगितले की, गठीत केलेल्या निविदा शिफारस समितीमध्ये १) संचालक (प्रकल्प)-मेट्रो २) मुख्य लेखा अधिकारी ३) प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग ४) मुख्य अभियंता, बृहन्मुंबई महानगर पालिका यांचा समावेश असून DMRC यांचा अहवाल निविदा शिफारस समितीपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आला. निविदा शिफारस समितीने DMRC यांच्या अहवालास दिनांक २३ जून, २०१६ रोजीच्या पहिल्या बैठकीत मान्यता दिली व पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) उघडण्याची शिफारस केली.

३.८ पात्र निविदाकारांचे लिफाफा 'क' (आर्थिक प्रस्ताव) दिनांक २८ जून, २०१६ रोजी ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. उघडलेल्या सर्व आर्थिक प्रस्तावांची छाननी

DMRC मार्फत करण्यात आली, निविदाकाराने दिलेल्या किंमतीचा गोषवारा खालीलप्रमाणे :-

| अ. क्र. | **निविदाकाराचे नाव** | अंदाजपत्रकीय किंमत | निविदाकाराने दिलेली किंमत (कोटी) |
|---|---|---|---|
| १ | M/s. AECOM Asia Company Ltd | १०.९६ कोटी | ८.६८ |
| २ | M/s. Systra MVA consulting (India) Pvt. Ltd. | | १९.५० |
| ३ | Consortium M/s. ३ TI Progetti Italia SPA & M/s. TCE | | ११.६० |
| ४ | M/s. AYESA Ingenieria Arquitectura, SAV | | **६.२४ लघुत्तम** |

३.९ मे. AYESA Ingenieria Arquitectura, SAV यांच्या (अंदाजपत्रकातील किंमतीपेक्षा ४३.०२% कमी) रु. ६.२४ कोटी + सेवा कर किंमतीचा देकार लघुत्तम आहे. निविदाकार निविदेतील सर्व अटींचे अनुपालन करणारे, सुसंवादी व रास्त असून DMRC यांनी पुढील मान्यतेसाठी अंतिम अहवाल प्राधिकरणांस सादर केलेला आहे.

३.१० निविदा शिफारस समितीने DMRC यांच्या अंतिम अहवालास दिनांक ५ जुलै, २०१६ रोजीच्या द्वितीय बैठकीत मान्यता दिली असून निविदा स्विकारण्याची शिफारस केली आहे.

३.११ वरील प्रस्तावावर चर्चा करताना मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी प्राप्त निविदा किंमतींच्या तफावतीविषयी तसेच DDC सल्लागाराच्या फी च्या एकूण प्रकल्पाच्या किंमतीशी असलेल्या प्रमाणाबददल विचारणा केली. यावर महानगर आयुक्त यांनी माहिती दिली की, लघुत्तम निविदा अंदाजपत्रकापेक्षा (-) ४३% कमी तर महत्तम निविदा (+) ७८% जास्त अशा आहेत. तसेच मेट्रो मार्ग -७ चे स्थापत्य बांधकाम व कारडेपोच्या बांधकामाची किंमत अंदाजे रु. १२०० कोटी इतके असून लघुत्तम निविदा ०.५२% आहे.

३.१२ मा. मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी लघुत्तम निविदा रास्त आहे का? अशी विचारणा केली. त्यावर खुलासा करताना महानगर आयुक्त यांनी सांगितले की, DMRC ने सादर केलेले रु. १०.९६ कोटींचे अंदाजपत्रक कोणत्याही DSR वर आधारीत नसून DMRC ने राबविलेल्या अन्य DDC निविदांच्या स्विकृत दरांवर आधारित आहे.

..८/-

३.१३ यावर श्री. द. म. सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी लघुत्तम निविदाकार अपेक्षित सेवा देऊ शकेल काय? याबाबत खुलासा मागितला. त्यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, M/s. Ayesa ही नावाजलेली व अनुभवी कंपनी असून भारतात व विदेशात त्यांनी अनेक मेट्रो प्रकल्पात सहभाग घेतला आहे. दिल्ली मेट्रो प्रकल्पातील तत्सम कामे त्यांनी केली असून नुकतेच लखनौ येथील मेट्रोचे सर्वसाधारण सल्लागाराचे (GC) काम त्यांना मिळाले आहे. महानगर आयुक्त यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, सदर DDC कामाच्या पहिल्या बोलीसाठी केवळ M/s.Ayesa यांची एकमात्र निविदा प्राप्त झाली होती. यावरुन M/s. Ayesa हा निविदाकार मुंबई मेट्रो प्रकल्पात सहभागी होण्यासाठी उत्सुक आहे हे दिसून येते.

**निर्णय :** **सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१३०५ :**

“**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (३), अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मे. AYESA Ingenieria Arquitectura, SAV यांचा रु ६.२४ कोटी (-४३.०२%) + सेवा कर किंमतीचा लघुत्तम देकार ई-निविदा स्विकारण्यास व DDC म्हणून नियुक्ती करण्यास तसेच त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या करारनाम्यातील अटींप्रमाणे अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

“**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.४ :** **<u>श्री. उमेश लुकतुके, तत्कालीन प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक चौकशी अधिकाऱ्याने सादर केलेला अहवाल मान्यतेकरीता सादर.</u>**

४.१ महानगर आयुक्त यांनी या विषयावरील सविस्तर माहिती देताना असे सांगितले की, मागील बैठकीत ठरल्यानुसार चौकशी अहवालाच्या प्रती सर्व सदस्य / निमंत्रित यांना दिनांक १६.०५.२०१६ रोजी पाठविण्यात आलेल्या आहेत.

४.२ चर्चेच्या दरम्यान असे विचारण्यात आले की, श्री. लुकतुके यांच्यावर कोणते आरोप लावलेले आहेत त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नगर विकास विभागाने श्री.लुकतुके यांचेवर खालीलप्रमाणे आरोप लावण्यात आले होते :-

a. Failed to apply the correct DCR i.e. DCR 1967 and instead applied two sets of DCR i.e. draft DCR 1989 and DCR 1991 and tried to justify this on the ground that stringent of the two DCRs were applied.

b. Did not verify the compliance of previous CC conditions before issuance of further CC and OC.

c. Treated the letter dated 15.03.2003 by Shri P.V.Deshmukh as being the CRZ clearance.

d. Calculated the premium for condoning deficiency in Open Spaces due to podium but not forwarded the same for Metropolitan Commissioner approval.

सदर आरोप शासनाने नेमलेल्या द्विसदस्यीय समितीने केलेल्या शिफारशीवर आधारीत होते.

४.३ मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, कार्यकारी समितीच्या नविन सदस्यांना चौकशी अहवालाच्या प्रती देण्यात याव्यात. त्याप्रमाणे सदर बैठकीत उपस्थित असलेले श्री.डी. के. जैन, अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, श्री. सतिश गवई, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग व श्री. द. म. सुकथनकर, तज्ञ सदस्य यांना चौकशी अहवालाच्या प्रती देण्यात आल्या. तसेच मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, व्दिसदस्य चौकशी आयोगाने श्री. लुकतुके यांचेवर कोणकोणते आरोप लावलेले आहेत त्याचे Extract चे प्रती देखील सर्व सदस्यांना पाठविण्यात याव्यात. त्यानंतर हा विषय पुढील बैठकीत पुन्हा सादर करण्यात यावा.

..१०/-

**बाब क्र.५ : प्राधिकरणाचे दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली.

**निर्णय : प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.**

**बाब क्र.६ (अ) : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक ०१ जानेवारी, २०१६ ते ३१ मार्च, २०१६**

दिनांक ०१ जानेवारी, २०१६ ते ३१ मार्च, २०१६ हया कालावधीत प्राधिकरणाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार विविध बँका / वित्तीय संस्था यामध्ये केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय : सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.६ (ब) : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक ०१ एप्रिल, २०१६ ते ३० जून, २०१६**

दिनांक ०१ एप्रिल, २०१६ ते ३० जून, २०१६ हया कालावधीत प्राधिकरणाने शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार विविध बँका / वित्तीय संस्था यामध्ये केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय : सदरहू गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र.७ :** **<u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ ते ३१ मार्च, २०१६</u>**

मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१५ ते ३१ मार्च, २०१६ रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

<u>निर्णय :</u> **<u>सदरहू सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.</u>**

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

**********